# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे क्र.०१ आकाश अविनाश डोईफोडे,वय ३२ वर्ष,पद—मुख्याधिकारी,वर्ग—२,नगर परिषद,जळगाव जामोद रा. अग्नीशामन क्वार्टर,भाजी मार्केट जवळ,जळगाव जामोद,जि.जळगाव जामोद<br>आलोसे क्र.०२.श्री.दिपक कैलास शेळके,वय ३० वर्षे,पद—विदयुत पर्यवेक्षक,वर्ग—३,नगर परिषद,जळगाव जामोद रा.उबाळखेड,ता. मोताळा,जि.बुलढाणा |
| लाच मागणी | १२,०००/—रुपये |
| लाच स्विकारली | १२,०००/— रुपये |
| घटनास्थळ | नगर परिषद,जळगाव जामोद चे विदयुत/नगर रचना विभागात |
| घटना तारीख | १३.१२.२०२३ |

**थोडक्यात हकीकत** :—यातील तक्रारदार यांचे कंपनीचे नगर परिषद,जळगाव जामोद अंतर्गत केलेल्या पथदिव्यांच्या देखभाल दुरूस्तीच्या कामाचे माहे जुलै,ऑगस्ट व सप्टेंबर चे बिल तसेच तक्रारदार यांनी स्वत: केलेल्या कामाचे बिल अदा केल्याचा मोबदला म्हणून यातील लोकसेवक क्र.०२ श्री.शेळके यांनी स्वत:साठी ६०००/— रूपये व आलोसे क्र.०१ श्री.डोईफोडे यांच्यासाठी ६०००/— रूपये असे एकूण १२,०००/— रूपये लाचेची मागणी करित असल्याबाबत लाप्रवि,बुलढाणा घटकाकडे तकार दिली होती.

त्यासंबधी आलोसे क्र.०१ श्री.डोईफोडे यांची पडताळणी केली असता त्यांनी लाच रक्कम स्विकारण्यास संमती देवून लाच रक्कम आलोसे क्र.०२ यांचेकडे देण्यास सांगीतले. त्यावरून सापळा कारवाई आयोजीत केली असता. आलोसे क्र.०२ यांना लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यावरून त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन जळगाव जामोद, येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कार्यवाही :— १.मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,
अमरावती, परिक्षेत्र अमरावती
२.मा.श्री.देविदास घेवारे,अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,
अमरावती, परिक्षेत्र अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, महेश भोसले, सापळा पथक, एएसआय/भांगे, पोहेकॉ/विलास साखरे,प्रविण बैरागी, रवि दळवी, पोना/जगदीश पवार,विनोद लोखंडे,पोकॉ.शैलेश सोनवणे,मपोकॉ/स्वाती वाणी, चानापोकॉ/नितीन शेटे,पोकॉ,अरशद शेख,सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा. कार्यालय दुरध्वनी कमांक ०७२६२—२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी केले आहे.

( श्रीमती शितल घोगरे )
पोलीस उपअधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner